सातारा नगरपरिषद, सातारा
पाणीपुरवठा विभाग, सातारा
दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३४०७६/२३४०७७

जाक्र/सानप/पापु/ 194.
सातारा नगरपरिषद, सातारा
दिनांक :- 02/09/2024.

## ई निविदा सूचना क्रमांक १ सन २०२४-२०२५ (ऑनलाईन)

मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा ४१५००१ (दुरध्वनी क्रमांक २३४०७६) महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण / सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून तसेच शासकीय / निमशासकीय कामाचा अनुभव असलेल्या मक्तेदाराकडून खालील वार्षिक कामांकरिता बी - २ नमुन्यातील निवीदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

| ई निविदा काम क्रमांक | कामाचे नाव | इसारा / बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ई निविदा संचाची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | जकातवाडी फिल्ट्रेशन प्लॅन्ट, पंप हाऊस व उपळी के. टी. वेअर शहापूर हाऊस येथे सेवा पुरविणे व देखभाल दुरुस्ती करणेसाठी (मेन्टेनेन्ससह) वार्षिक दर मागविणे. | ५०,०००/- | कार्यादेशा पासून १ वर्ष | २,००० + १८% GST |

## ई - निविदेचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा ऑनलाईन डाऊनलोड करण्याचा कालावधी (निविदा विक्री) | दि. 03/09/2024 ते दि. 10/09/2024. |
| २ | निविदाकारांनी ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक (तांत्रिक व आर्थिक निविदा दिनांक व वेळ) | दि. 10/09/2024.रोजी वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ३ | तांत्रिक आणि आर्थिक देकार उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ | मा. मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद यांचे कार्यालयात दि. 12/09/2024. रोजी सकाळी १०.०० नंतर ऑनलाईन निविदा उघडण्यात येतील (शक्य झाल्यास) |

**कामाचे अटी व शर्तीचा तपशील:-**

१) **तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र. १**

अ) बयाणा रक्कम जमा केलेचा रिपोर्ट

ब) अनुभव व पात्रता समर्थनार्थ कागदपत्रे. निविदाधारकाकडे शासकीय नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक राहील.

क) पॅनकार्ड नंबर असणे आवश्यक, नसल्यास आयकर नियमाप्रमाणे २०% रक्कम कपात केली जाईल.

ड) EPF act अन्वये नोंदणी प्रमाणपत्र.

ई) वस्तू व सेवाकर (GST) नोंदणी प्रमाणपत्र.

फ) संविदेमध्ये पदाधिका-यांचे सहभाग नसलेबाबतचे प्रतिज्ञापत्र, परिशिष्ट (अ)

ग) निविदाकाराच्या वतीने कोणास प्राधिकृत केले असल्यास त्याबाबतचे कूल मुखत्यारपत्र किंवा अभिकर्ता असल्यास पुरावा.

ह) WTP/STP/पाणीपुरवठा योजना चालविणेचा अनुभव.

२) **वित्तीय बोलीचा लिफाफा क्र. २**

तसेच वरील कामांच्या दरामध्ये वस्तू व सेवाकराचा समावेश नाही. मक्तेदार यांचे देयकामध्ये प्रचलित दराने वस्तू व सेवाकर अदा करणेत येईल. त्यामुळे मक्तेदार यांनी वस्तू व सेवाकर वगळून निविदा दर भरावेत. शर्त दरपत्रक सादर करु नये. लिफाफा क्र. १ फोडून त्यामधील कागदपत्रांची तपासणी करुन आवश्यक ते कागदपत्रे असलेनंतरच लिफाफा नं. २ फोडणेत येईल. अन्यथा निविदेचा विचार केला जाणार नाही.

१)सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या Main Portal- http://mahatenders.gov.in साईटवर enrolled करणे आवश्यक आहे.

२)निविदा धारकाने निवीदा किंमत मा. मुख्याधिकारी नगरपरिषद सातारा यांचे नावे असलेले युको बँकेच्या शाखा सातारा खाते नं. २०३४०२१०००१३८७ IFSC CODE UCBA ०००२०३४ यावर ऑनलाईन पध्दतीने लिफाफा क्र. २ मध्ये भरणा करावा. (online portal वर भरणे आवश्यक आहे.)

३)निविदाकारांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका / अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. टोल फ्री नंबर- (२४x७) १८००३०७०२२३१ / ८००७२११४०३

४)इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

५)याबाबत सदरचे कामाचा कालावधी कार्यादेश दिल्यापासून १ वर्ष राहिल व काम समाधानकारक असल्यास पुढील वर्षाकरीता मुदत वाढ देता येईल. याबाबत सर्वसाधारण सभेचा निर्णय अंतिम असेल.

६)सदरच्या कामाबाबत माहिती कार्यालयीन वेळेत पाणीपुरवठा विभागामध्ये उपलब्ध आहे.

७)निविदाधारकाने कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ अंतर्गत कर्मचारी भविष्य निर्वाह निधी नोंदणी रजिस्ट्रेशन आवश्यक असलेने नोंदणी प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहिल.

८)निविदा भरलेनंतर सदर निविदाबाबत मी काम करु शकणार नाही अशा प्रकारचे कोणतेही पत्र व्यवहार चालणार नाही. जर मक्तेदाराने अशा प्रकारचे पत्र व्यवहार केला तर त्या मक्तेदाराचे ऑनलाईन भरलेली बयाणा रक्कम जप्त करणेत येईल याची नोंद घ्यावी.

९)मक्तेदाराने ज्या कामासाठी ऑनलाईन पैसे भरलेले आहेत त्या बयाणा रकमेच्या पावतीवर त्याचे अथवा पार्टनरशीप फर्मचे नाव सही व शिक्का करुन ती पावती ऑनलाईन अपलोड करावी.

१०)निविदाधारकाकडे सार्वजनिक बांधकाम विभाग / महाराष्ट्र जीवन प्राधिकरण / जिल्हा उपनिबंधक (मजूर संस्था) कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराचे वैध नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक राहील. (शासकीय)

११)भागीदारी संस्थेच्या (joint venture) बाबतीत संबंधित अधिनियमान्वये भागीदारीबाबतचा योग्य तो दस्तऐवज सादर करणे आवश्यक राहिल. सहकारी संस्था / कंपन्या यांचे बाबतीत त्यांचेकडील योग्य त्या अधिनियमाखाली नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक राहिल.

१२)निविदाधारकाने निविदेसोबत Income Tax Registration, Pan Card, GST Registration तसेच निविदेच्या अंतिम तारखेपर्यंत आयकर भरलेबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल, तसेच वरील कामांच्या दरामध्ये वस्तू व सेवाकराचा समावेश नाही. मक्तेदार यांचे देयकामध्ये प्रचलित दराने वस्तू व सेवाकर अदा करणेत येईल. त्यामुळे मक्तेदार यांनी वस्तू व सेवाकर वगळून निविदा दर भरावेत. संदर्भ मा. उपसचिव महाराष्ट्र शासन, वित्त विभाग मंत्रालय मंुबई शासन परिपत्रक क्र. - GST-२०१७/प्रक्र८१कराधान - १ दि. १९ ऑगस्ट २०१७ प्रमाणे नोंद घ्यावी.

१३)सदर कामाबाबत संबंधित नगरपरिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध किंवा भागीदारी नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील. (नमुना सोबत दिलेला आहे.)

१४)निविदाधारकांनी निविदेतील सर्व दस्तऐवज scan करुन online ई- निविदा प्रणालीच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द केलेल्या वेळापत्रकानुसार uplode करणे अनिवार्य राहील. Technical Bid मधील कागदपत्रे Hardcopy मध्ये सादर करणे तूर्त आवश्यक नाही.

१५)लिफाफा क्र. १ मधील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता होत नसल्यास लिफाफा क्र. २ उघडण्यात येणार नाही. तसेच याबाबत मुख्याधिकारी यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

१६)निविदेसोबत बयाणा रक्कम न भरल्यास किंवा सादर केलेल्या कोणत्याही कागदपत्रामध्ये खरेपणा न आढळल्यास, निविदा सादर करताना भ्रष्ट व कपट मार्गाचा अवलंब केल्याचे निदर्शनास आल्यास, सशर्त निविदा सादर केल्यास, नगरपरिषदेने नमुद केलेली पात्रता पूर्ण करु न शकल्यास, अशा परिस्थितीत निविदा फेटाळण्यात येतील.

१७) निविदा दर १ वर्ष कालावधीसाठी ग्राह्य धरले जातात.

१८)किमान वेतन कायदा १९४८, वेतन प्रदान १९३६, बालकामगार ( प्रतिबंध व निर्मुलन ) अधिनियम १९८६ व अन्य कामगार कायद्याचे तसेच सक्षम प्राधिकारी यांच्या आदेशाचे पालन करण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहिल. तसेच EPF Act १९५२ अन्वये नोंदणी प्राप्त करुन त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील.

१९)अभिकर्त्याने पुरविलेली साधनसामग्री कामगारांनी उपयोगात आणली पाहिजे व त्या सामुग्रीचा वापर संबंधितांकडून योग्य रितीने होत आहे. याची खात्री करुन घेण्यासाठी अभिकर्ता पुरेशी उपाययोजना करील.

१९) काम करीत असताना कामगारांना होणा-या संभाव्य दुखापतीच्या उपचारासाठी तातडीच्या प्रथमोपचाराची पुरेशी तरतुद तसेच आवश्यक ती वैद्यकीय सुरक्षा साधन सामुग्री व प्रथमोपचार उपकरण संच अभिकर्ता पुरविल व तातडीच्या वापरासाठी सुस्थितीत ठेवील आणि त्यासंबंधीत नियमांचे अवलंब करील.

२०)कामाचे ठिकाणी अभिकर्ता किंवा करारनाम्यामध्ये नामनिर्देशित केलेली जबाबदार व्यक्ती व्यतिरिक्त अन्य कोणी काम करुन घेत असल्याचे आढळून आल्यास संबंधित अभिकर्त्यावर कारवाई करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांना राहतील.

२१)कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही अभिकर्त्याच्या या निविदेतील कोणत्याही बाबीसाठी वाढीव दर मागण्याचा हक्क असणार नाही.

२२)नगरपरिषदेच्या पूर्व मंजूरीशिवाय कामावर सब कॉन्ट्रॅक्टर नेमता येणार नाही कामावर सब कॉन्ट्रॅक्टर आढळल्यास अभिकर्त्यावर आवश्यक ती कारवाई करणेत येईल.

२३)केंद्र व राज्य शासनाच्या नियमाप्रमाणे योग्य ते कर प्रचलित दरानुसार होण्या-या बिलातून कपात करणेत येतील.

२४)मंजूर अभिकर्ता / एजन्सी यांनी योग्य त्या मुद्रांक शुल्क पेपरवर नगरपरिषदेच्या अटी / शर्तीनुसार करारनामा करुन देणे बंधनकारक आहे.

२५)देयकाची अदायगी नगरपरिषदेकडील योग्य उपलब्ध निधीनुसार केली जाईल त्यामुळे बील

अदा करणेसाठी ठराविक मुदतीचे बंधन घालता येणार नाही याची नोंद कंत्राटदाराने घ्यावयाची आहे.

२६)वरील कामाबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास तो सातारा नगरपरिषदेस ज्या न्यायालयाच्या कक्षेत येते त्या क्षेत्रात चालेल.

२७)निविदाधारकाकडील कामगार व पर्यवेक्षक कर्मचारी यांची नावासह यादी, तसेच कामगार कायद्यानुसार आवश्यक परवाने निविदा मंजूर झाल्यावर सादर करणे आवश्यक राहील.

२८)प्रत्यक्ष काम करताना कोणत्याही प्रकारच्या घटनेने ठेकेदाराच्या मनुष्यबळ अथवा वाहनास अपघात किंवा ईजा झाल्यास अथवा दुर्देवाने मृत्यू झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. त्यामुळे वाहन व कर्मचारी यांचा विमा उतरवण्याची जबाबदारी कंत्राटदार यांची राहील.

२९)ठेकेदारांनी कामगारांना कामगार कायद्यान्वये पगार देणे बंधनकारक राहिल.

३०)नगरपरिषदेस यंत्रणा सुरळीत व सफलतेने चालवणेच्या दृष्टीने इतर अटी, शर्ती आवश्यकतेप्रमाणे अंतर्भूत करणेत येतील. तसेच नगरपरिषद अधिकारी कर्मचारी यांनी वेळोवेळी केलेल्या सुचनांचे पालन करणे मक्तेदार यांचेवर बंधनकारक राहील.

३१)निविदाधारकाकडे किमान आवश्यक कामगारांची यादी जोडणे आवश्यक आहे.

३२) नगरपरिषदेकडे प्राप्त होणा-या तक्रारींसंबंधी दखल घेणे व तक्रारींची पूर्तता करणे मक्तेदार यांचेवर बंधनकारक राहील.

३३) शहापूर उपळी केटी वेअरमध्ये आवश्यक पाण्याची पातळी ठेवणे जेणेकरुन पाणीपुरवठ्यावर कोणताही परिणाम होणार नाही याची दक्षता घेणे हे मक्तेदारावर बंधनकारक राहील. तसेच खाणीतील टाक्यांची लेव्हल मेन्टेन ठेवणे, पहाटे चेक करणे आणि नगरपरिषद कर्मचा-यांना कळविणे ही सदर मक्तेदाराची जबाबदारी राहील. तसेच नगरपरिषद अधिकारी कर्मचारी यांनी वेळोवेळी केलेल्या सुचनांचे पालन करणे मक्तेदार यांचेवर बंधनकारक राहील.

३४) जकातवाडी व जॅकवेल येथील ट्रान्सफार्मर ऑईल लेवल वेळोवेळी चेक करणे, ऑईल फिल्ट्रेशन करुन घेणे. सदर कामात दुर्लक्ष होणार नाही याची कंत्राटदाराने खबरदारी घेणे. कंत्राटदाराचे दुर्लक्षामुळे यंत्रणेत बिघाड होऊन पंपिंग बंद पडलेस, पाणी पुरवठा विस्कळीत झालेस त्याची सर्व जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

३५) फिल्टर व उपसा केंद्र येथे लॉग बुक ठेवणे त्यामध्ये नेहमीच्या माहितीसह ड्युटीवर असणारे कर्मचारी, विद्युत पुरवठा / खंडीत होणारे टाईमिंगची नोंद करणेची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

३६) वीज पुरवठा बंद पडलेस म.रा.वि. मंडळास संपर्क साधून वीज चालू करुन घेणे तसेच पाणीपुरवठा विभागास तात्काळ फोनवर संपर्क साधून माहिती देणेची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

३७) फिल्टर उपसा केंद्र येथे प्रत्येक पंप, मोटार व कॉम्प्रेसरकरीता स्टॅण्डबाय असून ते चालू कंडिशनमध्ये ठेवणे तसेच कोणत्याही परिस्थितीमध्ये शहरातील पाणीपुरवठा बंद ठेवून दुरुस्तीचे काम करणेची वेळ येणार नाही याची दक्षता कंत्राटदाराने घ्यावयाची आहे.

३८) शहरातील पाण्याची टाकी भरुन घेतलेनंतर व पाणी सोडतांना खाणीतील एम.बी.आर. ची लेव्हल चेक करणे व लॉगबुकला नोंद करणेची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

३९) फिल्टर रोज धुवून घेणे. वेळेवर तुरटी, ब्लीचींग पावडर व क्लोरीन गॅसचा वापर करुन पाण्याची गुणवत्ता राहील व नागरिकांना शुध्द पाणी पुरवठा होईल याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील तसेच याबाबतचे वेळापत्रक पाणीपुरवठा केंद्रावर उपलब्ध ठेवणे आवश्यक राहील.

४०) जलशुध्दीकरण केंद्र येथे दर तासाला नियमीतपणे शुध्द पाण्याची तपासणी, चाचणी घेवून (ओ. टी. टेस्ट) पाणी पिण्यास योग्य असलेबाबत खात्री करुन त्याची नोंद स्वतंत्र रजिस्टरमध्ये ठेवणे.

४१) जलशुध्दीकरण केंद्र व पंप हाऊस येथील सर्व व्हॉल्व्ह वेळोवेळी ग्रीसींग करणे, ग्लॅण्ड भरणे व मेन्टेनन्स करणेची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

४२) शहापूर येथील के. टी. वेअर मधील पाणी साठा कमीत कमी आठ दिवस पुरेल अशी राहणेची आधी तशी कल्पना नगरपरिषद मुख्याधिकारी, पाणीपुरवठा अभियंता यांना देणेची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

४३) जकातवाडी फिल्ट्रेशन प्लॅन्ट व शहापूर येथील पंप हाऊस परिसर स्वच्छ ठेवणे तसेच सदर परिसरात त्रयस्थ व्यक्तींना प्रवेश न देणे व कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता घेणेची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

४४)निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

४५) सदरच्या कामामध्ये कोणत्याही प्रकारचा कसूर झालेस किंवा जकातवाडी फिल्ट्रेशन प्लॅन्ट व शहापूर येथील पंप हाऊसमधील कर्मचा-यांच्या हलगर्जीपणामुळे पाणी वाया गेल्यास व सदर प्लॅन्टच्या ठिकाणी कर्मचारी कामावर हजर नसलेस दिवसाला रक्कम रु. १,०००/- ते रक्कम रु. ५,०००/- पर्यंतचा दंड संबंधित कंत्राटदाराच्या बिलामधून वसूल करणेत येईल.

(अभिजीत बापट)
मुख्याधिकारी
सातारा नगरपरिषद, सातारा